*Shri ShardaBhavan Education Society's*

# RAJIV GANDHI MAHAVIDYALAYA

**MUDKHED, DIST. NANDED (Maharashtra)**
**Accredited by NAAC with'B' Grade**

## Cultural Department
## Poster Presentation Competition

## पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचा अहवाल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व नेताजी सुभाष चंद्र बोस कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दिनांक 16 सप्टेंबर 2025 रोजी करण्यात आले होते. या राष्ट्रीय परिषदेनिमित्त महाविद्यालयीन स्तरावर पर्यावरण जागृतीसाठी पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित केली होती या स्पर्धेत प्रस्तुत महाविद्यालयाच्या वतीने दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत राजीव गांधी महाविद्यालयास द्वितीय आणि तृतीय पारितोषिक प्राप्त झाले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि नेताजी सुभाष चंद्र बोस महाविद्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण शास्त्र विभागाच्या वतीने विद्यापीठ स्तरीय, महाविद्यालय आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धा आयोजित केली होती. प्लास्टिकचा अतिवापर आणि वाढती जागतिक तापमान वाढ ही आंतरराष्ट्रीय समस्या बनली आहे. पर्यावरणासंदर्भात विद्यार्थ्यांत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे विषय होते 1)शाश्वत कृषी व हरित अर्थव्यवस्था आणि 2)प्लास्टिक प्रदूषण जागरूकता व उच्चाटन. या स्पर्धेसाठी राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड च्या वतीने दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. दोन्ही विद्यार्थ्यांना पारितोषिक प्राप्त झाले. द्वितीय पारितोषिक अंजली रमेश सोनटक्के तर तृतीय पारितोषिक सलोनी गजानन हनुमंते यास प्राप्त झाले. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव माननीय डी. पी. सावंत कोषाध्यक्ष उदयरावजी निंबाळकर, सहसचिव डॉ. रावसाहेब शेंदारकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी एच मेहत्रे, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

| अ क्र | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग | पोस्टर स्पर्धेतील विषय | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|---|
| 1 | सलोनी गजानन हनुमंते | B.Sc. III | प्लास्टिक प्रदूषण | 8667641591 |
| 2 | अंजली संतोष सोनटक्के | B.Sc. II | शाश्वत कृषी | 9209496129 |




पोस्टर सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यासोबत डॉ. माधव बसवंते डॉ. डी.एच. मेहत्रे डॉ. विजयसिंह ठाकूर डॉ. आर. बी. कोटलवार डॉ. ऋषिकेश मंगल




पोस्टरसह विद्यार्थिनी कुमारी अंजली सोनटक्के, कुमारी सलोनी हनुमंत




पोस्टर सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यासोबत डॉ. माधव बसवंते डॉ. डी.एच. मेहत्रे डॉ. आर. बी. कोटलवार




पोस्टरसह विद्यार्थिनी कुमारी अंजली सोनटक्के, कुमारी सलोनी हनुमंत




(ARTS, COMMERCE & SCIENCE)




Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.




(ARTS, COMMERCE & SCIENCE)

दैनिक
# सत्यप्रभा

20 Sep 2025 - Page 3

स्पर्धा | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी केली पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती

## राजीव गांधी महाविद्यालयास पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत यश

प्रतिनिधी | मुदखेड



### प्रदूषण निवारण्यासाठी पोष्टरमधून सादरीकरण

पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ''शाश्वत कृषी व हरित अर्थव्यवस्था'' आणि ''प्लास्टिक प्रदूषण जागरूकता व उच्चाटन'' हे या स्पर्धेचे विषय ठरविण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोठा सहभाग घेतला होता. आणि समाजातील विविध समस्या मांडण्याचा प्रयत्न केला होता.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने नुकतेच विद्यापीठ स्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

संपूर्ण विद्यापीठ परिक्षेत्रातील अनेक महाविद्यालयाच्या स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत मुदखेड येथील राजीव गांधी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय आणि तृतीय पारितोषिक मिळविले.

पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ''शाश्वत कृषी व हरित अर्थव्यवस्था'' आणि ''प्लास्टिक प्रदूषण जागरूकता व उच्चाटन'' हे या स्पर्धेचे विषय ठरविण्यात आले होते.

पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत मुदखेड येथील राजीव गांधी महाविद्यालयातील अंजली रमेश सोनटक्के हिने द्वितीय पारितोषिक तर सलोनी गजानन हनुमंते हिने तृतीय पारितोषिक पटकावले. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेडचे सचिव, डी. पी. सावंत, कोषाध्यक्ष ॲड. उदयराव निंबाळकर, सहसचिव डॉ. रावसाहेब शेंदारकर, प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. एच. मेहत्रे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विजेत्या विद्यार्थिनींचे मन:पूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

Date:20/09/2025

# देशोन्नती

## राजीव गांधी महाविद्यालयाचे यश



देशोन्नती वृत्तसंकलन

**मुदखेड :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या विद्यापीठ स्तरीय 'पोस्टर प्रेझेंटेशन' स्पर्धेत मुदखेड येथील राजीव गांधी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी द्वितीय आणि तृतीय पारितोषिक मिळविले.

पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत मुदखेड येथील राजीव गांधी महाविद्यालयातील अंजली रमेश सोनटक्के हिने द्वितीय पारितोषिक तर सलोनी गजानन हनुमंते हिने तृतीय पारितोषिक पटकावले. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. (ता. प्र.)

Date:20/09/2025

Co-ordinator
Dr.D.H.Mhetre
Head,
Dept.of Political Science,
Rajiv Gandhi Mahavidyalaya,
Mudkhed,Dist.Nanded.

Principal
Dr. A.T. Shinde
PRINCIPAL
Rajiv Gandhi Mahavidyalaya
Mudkhed,Dist.Nanded